AAOB
ACP जनसंपर्क

जावक क्र ३०६९/२०१८
स्वारगेट पोलीस ठाणे पुणे,
दि३०/०६/२०१८

प्रति,
मा. सहा.पोलीस आयुक्त सो.
जनसंपर्क अधिकारी पुणे शहर,
यांना सविनय सादर,

रिपोर्ट :- एम.बी.पवार,पो.हवा.४७७५ स्वारगेट पोलीस ठाणे पुणे.
यांजकडून विनंती पुर्वक की

विषय :- बेवारस मयत स्त्रीचे नातेवाईकाचा तपास होणेबाबत.

महोदय

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, स्वारगेट पोलीस ठाणे अकस्मात मयत रजिस्टर नं.४४/२०१८ सी.आर.पी.सी.१७४ मधील बेवारस मयत अनोळखी स्त्री वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे नाव पत्ता माहीत नाही हा दि.२६/०६/२०१८ रोजी सायं.जेधे चौक उड्डाणपुलाखाली बेशुद्ध अवस्थेत मिळुन आल्याने तीला औषधौउपचार कामी ससुन हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तीचेवर एम.एल.सी.नं.१५०४२/२०१८ अन्वये १८/०० वा.चे सुमारास स्वारगेट मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषीत केले तीचेवर एम.एल.पी.एम.नं.३२६९/२०१८ अन्वये पोस्ट मार्टम होवून .सदर मयत बॉडी वारसाचे तपास कामी ३ दिवस शवगृहात ठेवण्यात आली आहे त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

एक अनोळखी महीला वय अंदाजे ३५ ते ४०,रंगाने
सावळी अंगाने सडपातळ,नेसणीस निळ्या रंगाची साडी
व ब्लाऊज,नाक सरळ,केस लांब उंची अंदाजे ५ फुट
अशा वर्णनाची

येणेप्रमाणे वरील वर्णनाच्या मयताच्या नातेवाईकांचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात माहीती प्रसिध्द होणेस विनंती आहे.